| | | | |
|---|---|---|---|
| MHLA120036932022 | केस दाखल दिनांक | | ०१/११/२०२२ |
| | केस नोंदणी दिनांक | | ०१/११/२०२२ |
| | केस निकाल दिनांक | | ३०/०३/२०२६ |
| | कालावधी | | वर्ष महिने दिवस<br>०३ ०४ २९ |
| | निशाणी क्र. | | ३० |

## भाग अ

| | | |
|---|---|---|
| | | **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, निलंगा यांचे न्यायालयात**<br>**(पिठासीन अधिकारी – श्रीमती ए.एस. गुंजवटे )**<br>**नियमित फौजदारी खटला क्र.७४१/२०२२** |
| | | गु.र.क्र.९६/२०२२<br>पोलिस स्टेशन – औराद शहाजानी<br>ता. निलंगा, जि. लातूर. |
| फिर्यादी | | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत औराद शहाजानी पोलीस स्टेशन,<br>ता. निलंगा, जि. लातूर |
| प्रतिनिधीत्व | | सहायक सरकारी अभियोक्ता श्री.व्ही.एन.मेहेत्रे |
| आरोपी | | देवाशिश दिलीप हलदर,<br>वय २८ वर्षे, व्यवसाय डॉक्टर,<br>रा.करोळा नार्थ २४ जिल्हा परगना वेस्ट बंगाल<br>हा.मु.होसुर, ता.निलंगा, जि.लातूर |
| प्रतिनिधीत्व | | आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एच.व्ही.आलमले |

## भाग ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची दिनांक | १६/०९/२०२२ |
| फिर्याद दाखल दिनांक | १६/०९/२०२२ |
| दोषारोप दाखल दिनांक | १९/१०/२०२२ |
| दोषरोप ठेवल्याचा दिनांक | २०/१०/२०२३ |
| प्रकरणात पुरावा सुरु झाल्याची दिनांक | १०/०२/२०२५ |
| प्रकरण न्यायनिर्णयासाठी ठेवल्याची दिनांक | ३०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय घोषित दिनांक | ३०/०३/२०२६ |
| शिक्षा सुनविल्याचा आदेशाची दिनांक जर असेल तर | -- |

## आरोपीचा तपशिल

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | देवाशिश दिलीप हलदर | अटक नाही | २०.१०.२०२३ | भा.द.वी.कलम ४२०, ४१९, १७५, १७९, मेडीकल कॉन्सील अॅक्ट १९५६ कलम १५(२) आणि महाराष्ट्र मेडीकल प्रॅक्टीसनर्स अॅक्ट १९६१ कलम ३३(अ) | निर्दोष | -- | -- |

## न्यायनिर्णय

(३० मार्च २०२६ रोजी अधिघोषित)

आरोपी हा भारतीय दंड संहिता, १८६० कलम ४२०, ४१९, १७५, १७९, मेडीकल कॉन्सील अॅक्ट, १९५६ कलम १५(२) आणि महाराष्ट्र मेडीकल

प्रॅक्टीसनर्स अॅक्ट १९६१ कलम ३३(अ) या गुन्हयाच्या अभियोगास सामोरे जात आहेत.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –**

२) डॉ.वैभव लक्ष्मण कांबळे हे प्राथमिक आरोग्य केंद्र, औराद शहाजानी, ता.निलंगा या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असतांना मा.तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, निलंगा याचे आदेश जा.क्र.२०२२/एमएजी/कावी– दि.०५/०९/२०२२ च्या आदेशाप्रमाणे निलंगा तालुक्यातील बोगस डॉक्टर तपासणी मोहीम आखण्यात आली होती. त्या मोहिमेमध्ये होसुर, ता.निलंगा या गावातील बोगस डॉक्टरांची तपासणी करण्याची जबाबदारी तपासणी पथक प्रमुख म्हणून सदर फिर्यादी यांची होती. फिर्यादी व त्यांच्या तपासी पथकांनी दिनांक १६/०९/२०२२ रोजी होसुर, ता.निलंगा गावात सकाळी ११.०० वाजण्याच्या सुमारास कालीदास धोंडीराम बिरादार यांच्या घरी भेट दिली होती. तथाकथित डॉक्टर आरोपी यांचा दवाखाना चालु असल्याचे तपासणी पथकाच्या निदर्शनास आले होते. त्यानंतर फिर्यादी यांनी आतमध्ये जाऊन पाहिले असता तेथे एक पलंगा असुन त्याचे आजुबाजूचे टेबलावर तपासणी साहीत्य औषध गोळया तसेच इंजेक्शन दिसुन आले. त्यानंतर गावातील लोकांच्याकडे आरोपी डॉक्टर म्हणून केव्हापासून प्रॅक्टीस करतो याची चौकशी केली असता तो मागील दोन वर्षापासून त्या गावामध्ये डॉक्टर म्हणून प्रॅक्टीस करत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर तपासी पथकाने आरोपी ज्या पॅथीचे उपचार करतो त्या पॅथीचे वैद्यकीय प्रमाणपत्र आणि महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टीसनर्स अॅक्ट, १९६१ किंवा इंडीयन मेडिकल अॅक्ट १९५६ अंतर्गत

प्रमाणपत्र पडताळण्यासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत आरोपीस सांगण्यात आले होते. आरोपी यांच्या दवाखान्यात कोणत्याही दर्शनी भागात कोठेही पॅथीचे आणि नोंदणी प्रमाणपत्र लावण्यात आलेले नव्हते. ते उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांना अर्धा तासाची मुदत सुध्दा देऊ केली होती. परंतु आरोपी ते उपलब्ध करुन देऊ शकला नाही. त्यामुळे संबंधित घटनेचा गावकऱ्यासमोर पंचनामा करण्यात आला. आरोपीकडे पदवी/पदवीका बोगस असल्याचे दिसून येते आणि तपासणी पथकाने विचारलेल्या प्रश्नांना आरोपीने उत्तरे देण्यास नकार दिला. आरोपीची पदवी ही इंडियन मेडिकल कॉन्सील अॅक्ट, १९५६ किंवा महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टीसनर्स अॅक्ट, १९६१ मधील अनुसूचीमध्ये नमुद नसल्याने महाराष्ट्रात त्यांना वैद्यकीय व्यवसाय करण्याचा अधिकार नसतांना आरोपी तसा व्यवसाय करत होता. पर्यायाने तो बोगस डॉक्टर असल्याचे निष्पन्न झाले. म्हणुन प्रस्तुत फिर्यादी यांनी आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली.

३) फिर्यादीवरून औराद शहाजानी पोलीस स्टेशन, ता. निलंगा, जि. लातूर येथे गु.र.क्र.I–९६/२०२२ ने गुन्हा नोंदविला. त्याचा पुढील तपास स.पो.नि. एस.ए.कामत यांनी केला. तपासामध्ये साक्षीदारांचे जबाब नोंदवले, घटनास्थळ पंचनामा केला. तपासामध्ये गुन्हा घडल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांनी आरोपींविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात हजर केले.

४) आरोपीविरुध्द नि.१५ लगत दोषारोप निश्चित केले. सदरचे दोषारोप आरोपीला मराठी भाषेत वाचुन दाखवुन समजावुन सांगीतला असता आरोपीने

त्याच्याविरुध्दचे दोषारोप नाकारले व त्याच्याविरुध्द खटला चालविण्याची विनंती केली.

५) आरोपींविरुध्द सदर गुन्हयाचे अनुशंगाने पुरावा मिळुन आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१) ब अन्वये नोंदविले जाणारे निवेदन नि.क्र.२९ कडे नोंदविण्यात आले.

६) खटल्यामधील साक्षीपुराव्याचे अवलोकन करता, प्रस्तुत खटल्याचे न्यायानिर्णयासाठी खालील मुद्दे माझे विचारार्थ प्रस्तुत होतात. त्यांचे निष्कर्ष व कारणमिमांसा खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | विचारार्थ मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | दिनांक १६/०९/२०२२ रोजीच्या दोन ते अडीच वर्षापुर्वीपासून मौजे होसुर, ता. निलंगा, जि. लातूर येथे आरोपीने त्याच्याकडे वैद्यकीय व्यवसायाचे कोणतेही कागदपत्र नसतांना डॉक्टर असल्याचे भासवून लोकांची ठकवणूक केली असे अभियोगपक्षाने शाबित केले आहे काय ? | | नाही |
| २. | वरील दिवशी, ठिकाणी, वेळी आरोपीने त्याच्याकडे इंडियन मेडीकल कॉन्सील अॅक्ट १९५६ किंवा महाराष्ट्र मेडीकल प्रॅक्टीशनर्स अॅक्टर १९६१ प्रमाणे त्याचे नाव अनुसूचीमध्ये नमुद नसतांना डॉक्टर असल्याचे तोतयागिरी करुन लोकांची ठकवणूक केली असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय ? | | नाही |
| ३. | वरील दिवशी, ठिकाणी, वेळी आरोपीने लोकसेवक फिर्यादी डॉ.वैभव लक्ष्मण कांबळे यांनी त्यांच्याकडील वैद्यकीय व्यवसायाचे कागदपत्र हजर करण्यास, स्वाधीन करण्यास आरोपी कायदयाने | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | बांधील असतांना त्याने ते हजर करण्यास टाळाटाळ केली असे अभियोगपक्षाने शाबित केले आहे काय ? | | |
| ४. | वरील दिवशी, ठिकाणी, वेळी आरोपीने लोकसेवक फिर्यादी डॉ.वैभव लक्ष्मण कांबळे यांनी त्यांच्याकडे वैद्यकीय व्यवसायाचे प्रमाणपत्र व परवाना याची मागणी केली असतांनाही उद्देशपूर्वक सदर कागदपत्रे देण्यास किंवा त्यासंबधी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देण्यास नकार दिलीअसे अभियोगपक्षाने शाबित केले आहे काय ? | : | नाही |
| ५. | वरील दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपीने त्याचे नाव इंडियन मेडीकल कॉन्सील अॅक्ट १९५६ किंवा महाराष्ट्र मेडीकल प्रॅक्टीशनर्स अॅक्ट १९६१ मधील अनुसुचीमध्ये नाव नमुद नसतांना वैद्यकीय व्यवसाय केला असे अभियोगपक्षाने शाबित केले आहे काय ? | : | नाही |
| ६. | वरील दिवशी, ठिकाणी, वेळी आरोपीने लोकांची ठकवणूक करण्याच्या उद्देशाने बनावट वैद्यकीय प्रमाणपत्र तयार केले व ते वैद्यकीय प्रमाणपत्र खरे म्हणून वापरले असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय ? | : | नाही. |
| ७. | आदेश काय ? | : | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ६–**

(७) याकामी अभियोग पक्षाने सादर केलेल्या पूराव्याचे स्वरुप पाहता पूराव्याची

पुनरावृत्ती टाळण्याकरीता मुद्दा क्र.१ ते ६ वर एकत्रित विश्लेषण करणे सोयीचे होणार असल्यामुळे सदर मुद्दे विश्लेषणाकरीता एकत्रित घेतलेले आहेत.

८) अभियोग पक्षाने एकुण पाच साक्षीदार तपासलेले आहेत. साक्षीदार क्र.१ व २ हे घटनास्थळ पंच आहेत. त्यांनी सदर घटनास्थळ पंचनामा त्यांच्या समक्ष झालेला नाही असे सांगितलेले आहे. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा शाबीत होऊ शकलेला नाही. त्यांना विचारलेल्या सुचक प्रश्नांमधूनही प्रस्तुत घटनास्थळ पंचनामा शाबीत झालेला नाही. साक्षीदार क्र.३ व ४ यांनी नि.क्र.२४ वरील जप्ती पंचनाम्यावर सही केली आहे. त्यांनी सदर जप्ती पंचनामा त्यांच्या समक्ष झालेला नाही असे सांगितलेले आहे. त्यामुळे जप्ती पंचनामा शाबीत होऊ शकलेला नाही. त्यांना विचारलेल्या सुचक प्रश्नांमधूनही प्रस्तुत जप्ती पंचनामा शाबीत झालेला नाही. साक्षीदार क्र.५ हे तपासिक अंमलदार आहेत. त्यांनी रेडवेळी आरोपीकडे वैद्यकीय व्यवसायाचा परवाना दिसुन आला नाही. तसेच त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली नाहीत असे कथन केले आहे. परंतु प्रस्तुत कामातील फिर्यादी तसेच इतर साक्षीदार यांची साक्ष अभियोग पक्षाने नोंदवलेली नाही. त्यामुळे प्रस्तुत कामातील फिर्याद शाबीत होऊ शकलेली नाही. फिर्यादी यांनी आरोपीकडे वैद्यकीय व्यवसायाचे प्रमाणपत्र व परवाना याची मागणी केली होती, आरोपीने उद्देशपूर्वक वैद्यकीय व्यवसायाचे प्रमाणपत्र व परवाना देण्यास टाळाटाळ केली, आरोपी यांनी फिर्यादी डॉ.वैभव कांबळे यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यास टाळाटाळ केली, त्याने डॉक्टर असल्याचे भासवून लोकांची ठकवणूक केली, त्याने बनावट वैद्यकीय प्रमाणपत्र तयार करुन पात्रताधारक डॉक्टर असल्याचे भासवून

लोकांची ठकवणूक केली, ठकवणूक करण्यासाठी बनावट वैद्यकीय प्रमाणपत्र तयार केले, ते वैद्यकीय प्रमाणपत्र खरे म्हणून वापरले, त्यांना महाराष्ट्रात वैद्यकीय व्यवसाय करण्याचा अधिकार नसतांना वैद्यकीय व्यवसाय केला, आरोपीने बनावट वैद्यकीय पदवीचे प्रमाणपत्र तयार केले इत्यादी बाबत कोणताही पुरावा अभियोग पक्षाने अभिलेखावर आणलेला नाही. त्यामुळे आरोपीविरुध्दचे दोषारोप हे शाबीत झालेले नाहीत.

९) सबब अभियोग पक्षातर्फे आरोपींविरूध्द भारतीय दंड संहिता, १८६० कलम ४२०, ४१९, १७५, १७९, मेडीकल कॉन्सील अॅक्ट, १९५६ कलम १५(२) आणि महाराष्ट्र मेडीकल प्रॅक्टीसनर्स अॅक्ट १९६१ कलम ३३(अ) प्रमाणेचा गुन्हा शाबित करणारा कोणताही पूरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपीविरूध्दचा गुन्हा पुर्ण संशयापलीकडे शाबीत होत नाही सबब, **मुद्दा क्र.१ ते ६ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.**

**मुद्दा क्र.७–**

१०) वरील चर्चेबरोबर अभियोग पक्षास आरोपीवरील दोषारोप सबळ पुराव्या आधारे शाबीत करता आलेले नाहीत. सबब, मुद्दा क्र.७ च्या निष्कर्षात मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी देवाशिश दिलीप हलदर रा.होसुर, ता. निलंगा, जि. लातूर यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० कलम ४२०, ४१९, १७५, १७९, मेडीकल कॉन्सील अॅक्ट, १९५६ कलम १५(२) आणि |

| | |
|---|---|
| | महाराष्ट्र मेडीकल प्रॅक्टीसनर्स अॅक्ट १९६१ कलम ३३(अ) या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपीच्या जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे व त्यांना मुक्त करण्यात येत आहे. |
| ३. | आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये रक्कम रू.१५०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व तेवढयाच रकमेचे जामीन बंधपत्र सादर करावे. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषीत करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.04.01 10:53:32 +0530

**(श्रीमती ए.एस.गुंजवटे)**

निलंगा — प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

दिनांक – ३०/०३/२०२६. — न्यायालय क्र.१, निलंगा

**भाग क**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी**

**अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | झटिंग विनायक बिरादार | घटनास्थळ पंच |
| २. | विलास नामदेव बिरादार | घटनास्थळ पंच |
| ३. | विठ्ठल मारोती कांबळे | जप्ती पंच |
| ४. | संदीप नरसिंग बिरादार | जप्ती पंच |
| ५. | संदीप आनंद कामत | तपासिक अंमलदार |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | निरंक | |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**अभियोग पक्ष/ आरोपी/ न्यायालयीन पुराव्यांची यादी**

**अ. अभियोग पक्षाचा पुरावा**

| निशाणी क्र. | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|
| २१. | घटनास्थळ पंचनामा |
| २४ | जप्ती पंचनामा |

**ब. आरोपीतर्फे पुरावा**

| निशाणी क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. न्यायालयीन पुरावा**

| निशाणी क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**ड. मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |